# औरंगाबाद येथे १४ डिसेंबरपासून हवामान बदलावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

परभणी (प्रतिनिधी): राज्यातील चारही कृषी विद्यापीठे आणि औरंगाबाद येथील पाणी व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हवामान बदल व त्यांचे कृषी आणि पाणी यावर होणारे परिणाम या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र १४ ते १६ डिसेंबर या कालावधीत 'वाल्मी' येथे आयोजीत करण्यात आले आहे. परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडे (वनामकृवि) चर्चासत्राचे यजमानपद आहे. या विषयावर आपल्या देशामध्ये प्रथमच आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे, अशी माहिती 'वनामकृवि'चे संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर यांनी दिली.

राष्ट्रीय अन्नसुरक्षेच्या दृष्टीने हवामान बदलाचे होणारे परिणाम हा सध्याचा महत्त्वाचा मुद्दा आहे. हवामान बदलाचा कृषी व पाणी क्षेत्रावर विपरीत परिणाम होत आहे. अवकाळी पाऊस, पूर परिस्थिती, गारपीट, उष्णतेची लाट तसेच पावसाचा खंड हे हवामान बदलाचे परिणाम आहेत. त्याचा परिणाम कृषी उत्पादन व पाण्याच्या उपलब्धतेवर होत आहे. हवामान बदलामुळे जमीन, पाणी व वातावरण या नैसर्गिक साधनसामग्रींचा ऱ्हास होत आहे. अतिवृष्टीमुळे वरचा सुपीक थर वाहून जाऊन जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत आहे. काही भागात कमी पाऊस पडत असल्यामुळे धरणांमध्ये पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे सिंचनाचे क्षेत्र कमी होत आहे. हवामान बदलामुळे पिकांवर किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. या सर्व बाबींवर या चर्चासत्रामध्ये विचारमंथन केले जाणार आहे.

या चर्चासत्राच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन परिषदेचे माजी महासंचालक पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा हे आहेत. आयोजन समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू आहेत. सहअध्यक्ष राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तपस भट्टाचार्य, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, वाल्मीचे महासंचालक एच. के. गोसावी हे आहेत. चर्चासत्राचे संयोजक वनामकृविचे संचालक संशोधक डॉ. दत्तप्रसाद वासकर हे असुन सहसंयोजक मफुकृवि, राहुरीचे डॉ. सुनील गोरंटीवार, वाल्मी औरंगाबादचे डॉ. अविनाश गरूडकर आहेत तसेच आयोजन सचिव मुख्य शास्त्रज्ञ डॉ. भगवान आसेवार हे आहेत. चर्चासत्राच्या आयोजनासाठी स्वतंत्र संकेतस्थळ (www.ccaw२०१७.org) तयार करण्यात आले असून, त्या आजपर्यंत त्यास सुमारे २५ हजारांहून अधिक शास्त्रज्ञांनी भेट दिली आहे.

या चर्चासत्रात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हिएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदीं देशांतील नामवंत शास्त्रज्ञ सहभाग घेणार असून मार्गदर्शन करणार आहेत. आजपर्यंत देशविदेशांतून सुमारे ८०० हून अधिक संशोधनपर निबंध प्राप्त झाले असून ६०० हून अधिक शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी होणार आहेत. चर्चसित्राचे उदघाटन १४ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता औरंगाबाद येथील महात्मा गांधी मिशनच्या रुक्मिणी सभागृहामध्ये होणार असून, उद्घाटन कार्यक्रमास पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा, निती आयोगाचे डॉ. रमेश चंद, चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू तसेच वाल्मीचे महासंचालक श्री. गोसावी, महिकोचे अध्यक्ष राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

चर्चासत्राचे सहआयोजक महिको (जालना) असून, यामध्ये सहभागी संस्था भारतीय कृषी संशोधन परिषद (नवी दिल्ली), जैन इरिगेशन (जळगाव), भारतीय स्टेट बँक, महाबीज, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, टास (नवी दिल्ली), विज्ञान व अभियांत्रिकी मंडळ (नवी दिल्ली) हे राहणार आहेत. अनेक खासगी कंपन्या आणि विविध संस्था या चर्चासत्रांचे प्रायोजक आहेत असे डॉ. वासकर यांनी सांगितले.